I.O. प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** इतवारा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0180  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/05/2025 22:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 61(2) |
| 4 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 62 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 24/05/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/05/2025
**Time From (वेळेपासून):** 15:43 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 30/05/2025  **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/05/2025 21:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** खान श्री हॉटेल समोर, इतवारा ,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name** (नाव): अब्दुल सोहेल पिता अब्दुल मुजीब
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999
   (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
   **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जामा मस्जीद जवळ अर्धापूर ,अर्धापूर ,अर्धापूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जामा मस्जीद जवळ अर्धापूर ,अर्धापूर ,अर्धापूर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

   (i) **Occupation** (व्यवसाय):
   (j) **Phone number** (फोन नं.):
   **Mobile** (मोबाइल नं.): 91-7218292405

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अयूब कूरेशी शेख | | | 1. नांदेड ,नांदेड ,इतवारा,नांदेड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | खासगी इसम राजू भिसे पाटील | | | 1. माहित नाही ,माहित नाही , इतवारा,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच मागणी रक्कम | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

50,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 30/05/2025
फिर्याद
मी अब्दुल सोहेल पि.अब्दुल मुजीब, वय 26 वर्ष, व्यवसाय ड्रायव्हर, रा.जामा मस्जिद जवळ, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड मो.न.7218292405,आधार नंबर 2524 8573 5840, ई मेल आयडी sohelpress55@gmail.com
समक्ष पोलीस स्टेशन इतवारा, जि.नांदेड येथे हजर येवून फिर्याद देतो की,मी वर नमुद ठिकाणी माझे परिवारासह राहण्यास असुन मी जनावरे ही हदगाव,उमरखेड,हिंगोली येथून घेवून नांदेडला येवून जनावरांच्या बाजारपेठेत विक्री करून माझे कुटूबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 23/05/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचेकडे तक्रार दिली ती खालील प्रमाणे मी जनावरे ही हदगाव, उमरखेड, हिंगोली येथून घेवून नांदेडला येवून जनावरांच्या बाजारपेठेत विक्री करतो. मी जनावरे खरेदी करतांना ग्रामपंचायतचा दाखला व आवश्यक परवानग्या ईत्यादी कागदपत्रे घेवून नेहमी हदगाव, उमरखेड,हिंगोली येथून 3 माझे लोडींग वाहनात आणत असतो. माझे वाहनामध्ये 3 जनावरे वाहतुक करण्याची क्षमता आहे. मी नियमाप्रमाणे जनावरांची वाहतुक करतो. परंतु मागील काही दिवसापासून माझे वैयक्तिक कारणामुळे मी जनावरांची वाहतुक करत नव्हतो.
अर्धापूर येथील माझे बरेचसे मित्र वगैरे जनावरांची वाहतुक करत आहेत.परंतु त्यांना डिवायएसपी ऑफीस, अर्धापूर येथील पोलीस उप निरीक्षक अयुब कुरैशी हे विनाकारण वाहन थांबवून त्यांना पैशाची मागणी करून जनावरे वाहतुक करण्यासाठी अडचण निर्माण करत आहे.
मला परत जनावरांची वाहतुक सुरू करायची असल्यामुळे, पुन्हा अडचण निर्माण होवू नये म्हणून मी माझे मोबाईल फोनवरून पोलीस उप निरीक्षक अयुब कुरैशी यांना त्यांचे मोबाईलवर दि. 23/05/2025 रोजी दुपारी 12.00 वाजता व्हॉटसअँप कॉल केला व त्यांना मी माझे नाव सांगून मला जनावरांची वाहतुक करायची आहे, काय कागदपत्रे वगैरे लागतात, ज्यामुळे मला जनावरे वाहतुक करतांना अडचण होणार नाही, याबाबत चौकशी केली. तेव्हा मला पोलीस उप निरीक्षक अयुब कुरैशी यांनी 50 देवून तुमची जनावरे वाहतुक सुरू करा असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ''पन्नास हजार का ?'' असे म्हणालो असता, त्यांनी होकार दिला. तेव्हा मी त्यांना खुप जास्त होत आहे असे बोललो. त्यावर ते म्हणाले की, तुम्ही मला येवून तर भेटा असे म्हणाले.
माझेकडे माझे वडीलांचे नावावर मॅक्सीमा लोडींग वाहन असून त्यामध्ये मला हदगाव, उमरखेड, हिंगोली येथून घेवून नांदेडला येवून जनावरांच्या बाजारपेठेत विक्री करायची आहे. त्यासाठी मला अर्धापूर येथील पोलीस उप निरीक्षक अयुब कुरैशी हे महिन्याचा हप्ता म्हणून मला 50,000/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक 23/05/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे पोलीस उप अधीक्षक श्री पवार यांना तोंडी तक्रार सांगीतली असता त्यांनी श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक यांना बोलावून त्यांचे समक्ष तक्रार देण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक यांना तोंडी तक्रार सांगितली असता, त्यांनी सदर तक्रार संगणकावर टंकलीखीत करून प्रिंट काढली होती.
माझे वरील तक्रारीचे अनुशंगाने व मला दिलेल्या सुचने प्रमाणे दिनांक 24/05/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड येथील पोलीस निरीक्षक श्रीमती प्रिती जाधव व त्यांचे सापळा कार्यवाही कामी उपस्थित शासकिय पंच क्र 1) प्रकाश नागोराव चरपिलवार, वय 45 वर्षे व्यवसाय नोकरी, पद - मुख्य तंत्रज्ञ, नेमणूक एम. आय.डी.सी. उपविभाग, नांदेड 2) शिवाजी चंपतराव कासारकर, वय 55 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद - उद्योग निरीक्षक, नेमणूक जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड व सापळा पथकातील सद्स्य अंमलदार पोहेकाँ/बालाजी मेकाले, पोकाँ/अरशद अहेमद खान, पोकाँ/ सय्यद खदीर, यांचेसह पोलीस निरीक्षक प्रिती जाधव यांनी पंचाची व सापळा

पथकातील सर्व सदस्याची ओळख करून दिली. त्यानंतर मी पंचा समक्ष माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर पो. नि. श्रीमती प्रिती जाधव यांनी त्यांचेकडे दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचुन मी दिलेली लेखी तक्रार व पंचा समक्ष तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करून सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर मी व पोलीस निरीक्षक प्रिती जाधव मॅडम यांनी पुर्वीच सहया केलेल्या आहेत.

त्यानंतर पो.नि. श्रीमती प्रिती जाधव यांनी लाच मागणी पडताळणीचा उद्देष सांगुन मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ/सय्यद खदीर यांनी पो.नि. प्रिती जाधव, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. श्रीमती प्रिती जाधव यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला लाचमागणी पडताळणी कार्यवाही अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी माझे मोबाईल नंबर 7218292405 या नंबरवरून 8007851703 या नंबरवर 15.43 वा. व्हॉट्सअँपव्दारे कॉल केला असता लोकसेवक आयुब कुरैशी (शेख) यांनी ''तु किधर है, इधर आजा खान श्री हॉटेल, इतवारा पोलीस स्टेशन के बाजू मे, खाना खाएंगे, आजा जल्दी'' असे सांगितले. त्यावरून वेळ 16.10 वा. पोकॉ/सय्यद खदीर यांनी पोनि.प्रिती जाधव यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात घालून दिल्याने लाचमागणी पडताळणी करीता मी व सोबत पंच क्रमांक 1 प्रकाश चरपिलवार असे माझी स्कुटीने लोकसेवक आयुब कुरैशी (शेख) यांची भेट घेण्यासाठी खान श्री हॉटेल, इतवारा रवाना झालो.

त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे खान श्री हॉटेल,इतवारा,नांदेड येथे पोहचल्यानंतर लोकसेवक आयुब कुरैशी (शेख) हे खान श्री हॉटेलचे बाहेर मला भेटले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, ''साब अभी कमाने का टाईम है, चार पैसे मै कमातू और चार पैसे आप कमाओ...........सर उसका कैसा करू'' (पंचा समक्ष तक्रारदार यांनी डाव्या हातानी पैशाचा ईशारा केला)........................ त्यावर लोकसेवक यांनी ''अमांउट'' असे म्हणाले............ तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक यांना म्हणाले की, ''अब किस के पास दु, इनके पास (पोउपनि अयुब कुरैशी यांच्या बाजूला असलेले राजू भिसे पाटील यांच्याकडे हाताने इशारा करून) दुं, की रहने दु ?'' असे म्हणताच खासगी इसम राजू भिसे पाटील म्हणाले की, ''मेरे पास रहने दो, उसका कोई टेन्शन नही.''.................. तेव्हा तक्रारदार यांनी म्हणाले की, ''जब गाडी जाने लगेगी, तब किसको फोन लगाऊ ?''................. त्यावर खासगी इसम राजू भिसे पाटील म्हणाले, ''मेरे को फोन लगाव, मै साब के साथ रहेता. तसेच राजू भिसे पाटील असेही म्हणाले की, ''जब, जब तुम्हारे गाडी मे जनावर लेकर जारे, उसके पहले हमको गाडी का नंबर बता देना'' त्यावेळी पोउपनि अयुब कुरैशी व त्यांचेसोबत असलेला खाजगी इसम राजू भिसे पाटील याने मला सांगितले की, वाहतुक करनेवाली गाडी का नंबर एसपी साहब को आता, वो डिवायएसपी साहब को बताते, डिवायएसपी साहब कुरैशी साब इनको बोलते'' असे म्हणाले. तेव्हा पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांचे समक्ष खासगी इसम राजू भिसे पाटील म्हणाले की, ''गाडी नंबर बताने के बाद, अगर वो तुम्हारे गाडीका नंबर होगा, तो तू तभीच गाडीका नंबर प्लेट बदल देना, या फिर रूट चेंज कर देना. अगर गाडी के सामने कोई आया तो, उडा देना'' असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी मला ''कल मिलेंगे'' असे सांगितले. तेव्हा मी त्यांना ''ठिक है'' असे म्हणून निघू लागलो तेव्हा माझेसोबत असलेले पंच क्र. 1 चरपिलवार यांना पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांनी पाहिले ''ये कौन है'' असे म्हणून विचारपुस करू लागले. तेव्हा मी त्यांना ''मेरे खेत मे का गडी है,. उसकू टीना दिलाके देने के है अपन अमजद के पास से'' असे म्हणालो, तेव्हा पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांनी पंच क्र. 1 यांना तुम्ही कुठले म्हणून विचारपुस केली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी शेंबोलीचा असे म्हणाले. तेव्हा पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांनी तुमच्या गावाला मी आलो होतो. चांद याच्याकडे वगैरे बोलू लागले. तेव्हा मी त्यांना जास्त विचारपुस करू न देता, तेथून वेळ काढून नेली.

त्यानंतर मी ला.प्र.वि. कार्यालय, नांदेड येथे परत आलो. तेव्हा पोनि श्रीमती जाधव मॅडम यांनी माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉडींग पंचासमक्ष मोठया आवाजात ऐकले. तेव्हा लोकसेवक पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांनी माझेकडून जनावरे वाहतुकीसाठी पन्नास हजार रूपये लाच राजू भिसे पाटील या त्यांच्या एजंटच्या माध्यमातून लाच मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले.

पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांनी मला उदया बोलाविले असल्याने आज रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली व उदया दि. 25/05/2025 सकाळी 10.00 वाजता मला ला.प्र.वि. नांदेड येथे हजर राहणेबाबत कळविले.

त्यानंतर मी दि. 25/05/2025 रोजी सकाळी माझेकडे ला.प्र.वि. नांदेड येथे जाण्यासाठी वाहन उपलब्ध नसल्याने मी वाहनाची वाट पाहत अर्धापूर तहसिल कार्यालयासमोर थांबलो, त्याठिकाणी मला पोउपनि अयुब कुरैशी (शेख) व त्यांचेसोबत असलेला खाजगी इसम राजू भिसे पाटील यांनी मला पाहिले व खाजगी इसम राजू भिसे पाटील याने मला त्यांचे मोबाईल क्रमांक 9325494906 या नंबरहून कॉल केला व ''हम बसस्टॅन्डके पास टिनपत्रे के दुकान के पास रूके है, तुम्हारे काम की बात करेंगे, आव इधर'', असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ''ठिक है'', असे

सांगून त्यांना न भेटताच दुपारी अडीच वाजण्याचे सुमारास ला.प्र.वि. कार्यालय, नांदेड येथे हजर झालो.

त्यानंतर मी ला.प्र.वि. कार्यालय, नांदेड येथे दुपारी अडीच वाजण्याचे सुमारास हजर झालो असता, त्या दरम्यान मला खाजगी इसम पाटील यांचे दोन कॉल येवून गेले होते. त्यावरून मी खाजगी इसम राजू भिसे पाटील यांना दुपारी तीन वाजण्याचे सुमारास व्हॉटस्अप कॉल केला असता, त्यांनी ''मला, कहा गायब हो गया, तुमको बात करने के वास्ते बुलाये थे साहेबने, कुरैशीया हॉटेल के पास अर्जंट आ जाओ''. तेव्हा मी त्यांना सांगितले की, ''मेरे पापा का कॉल आया था, मै अभी खेत मे आया हू, थोडा काम था खेत मे'', असे सांगितले. त्यांनी ''ठिक है, फ्रि हुये बाद कॉल करो'' असे म्हणून फोन कट केला.

त्यानंतर पोउपनि अयुब कुरैशी (शेख) व त्यांचेसोबत नेहमी राहणारा खाजगी इसम राजू भिसे पाटील यांनी मला माझे जनावरे वाहतुकीसाठी पन्नास हजार लाचेची मागणी केली असल्याने आज दि. 26/05/2025 रोजी त्यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरले. त्यानुसार मी व पंच क्र. 1 असे दोघे माझे स्कुटीवर व पंच क्र. 2, सापळा पथक व पोनि जाधव मॅडम असे खाजगी वाहनाने भोकर रोडवरील इंडीयन पेट्रोल पंपासमोर जावून थांबलो. त्याठिकाणी पोकॉ/अरशद खान यांनी खाजगी वाहनात बसून मला व पंचांना अँथ्रासिन पावडरचे प्रात्याक्षिक दाखवून मी हजर केलेल्या 500/- रू दराचे 100 नोटा असे एकुण पन्नास हजार रूपयाचे नोटावर अँथ्रासिन पावडर लावून माझे पॅन्टचे डाव्या खिष्यात ठेवले. पोकॉ/खदीर यांनी माझे गळयात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे गळयात अडकावून दिले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे दोघे माझे स्कुटीने पोउपनि अयुब कुरैशी (शेख) व खाजगी इसम राजू भिसे पाटील यांची भेट घेण्यासाठी डिवायएसपी ऑफीस, अर्धापूर येथे जावून पाहिले, त्याठिकाणी मला दोघेही दिसून आले नाही म्हणून मी पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांना व्हॉटस्अप कॉल केला असता, त्यांनी माझा कॉल उचलला नाही. त्यानंतर मी त्यांना साधा कॉल केला असता, त्यांनी तो पण कॉल उचलला नाही.

त्यानंतर मी खाजगी इसम पाटील यांना साधा कॉल केला असता, त्यांनी माझा कॉल उचलला नाही. त्यानंतर थोडया वेळात मला खाजगी इसम राजू भिसे पाटील यांचा साधा कॉल आला. तेव्हा मी कॉल उचलून स्पीकरवर टाकून बोललो, ''पाटील साहब, साहब से कुछ बात हइ क्या ? किधर है साहब, कैसा करना पैसे का'', असे विचारले असता, ते म्हणाले की, साहब अर्धापूर मेच है, मेरा भी फोन नही उठारे, पैसो का कुछ मालुम नही असे म्हणू लागले. तेव्हा मी त्यांना व्हॉटस्अप कॉल करो असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर व्हॉटस्अप कॉल केला असता, ''आपण कल मिलके बात करिंगे, मै शेख साब के पास जाके तुमकू फोन लगाता'' असे म्हणून फोन कट केला.

दि. 27/05/2025 रोजी पोउपनि अयुब कुरैशी (शेख) व खाजगी इसम राजू भिसे पाटील यांच्याशी संपर्क झाला नाही.

दि. 28/05/2025 रोजी पोउपनि अयुब कुरैशी (शेख) व खाजगी इसम राजू भिसे पाटील यांना लाचेची रक्कम पन्नास हजार रूपये देण्यासाठी मला व सोबत पंच क्र. 1 यांना डिवायएसपी ऑफीस, अर्धापूर येथे पाठविले. त्याठिकाणी पोउपनि अयुब कुरैशी (शेख) व खाजगी इसम पाटील हे दोघेही मिळून आले नाही. त्यानंतर मी त्या दोघांना व्हॉटस्अप कॉल व साधा कॉल केला असता, पोउपनि अयुब कुरैशी यांना माझा मोबाईल नंबर ब्लॉक लिस्टमध्ये टाकल्याचे मला समजले व खाजगी इसम राजू भिसे पाटील याने त्यांचा मोबाईल स्विच ऑफ केल्याने ते आता दोघेही माझेकडून लाचेची रक्कम पन्नास हजार रूपये स्विकारणार नाहीत.

तरी सापळा पथकाने परत येवून आम्ही संपूर्ण संभाषणाचे सर्व स्क्रिप्ट ऐकून त्याचे विश्लेषण केले. त्यावरून असे समजून आले की, पोउपनि अयुब कुरैशी (शेख) हे पोलीस अधिकारी असून त्यांना दखलपात्र अपराधाबाबत माहिती होती. त्यांचे समक्ष व त्यांचे मुकसंमतीने खाजगी इसम नामे राजू भिसे पाटील हे जनावरे वाहतुकीचे नियोजन करीत होते तसेच अशा जनावरे वाहतुकीस जर कोणी अडथळा आणल्यास त्यास गाडीने ठोकर देवून उडवून देण्याची भाष्य देखील करीत होते.

पोउपनि अयुब कुरैशी (शेख) यांचे पोलीस अधिकारी म्हणून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 168 प्रमाणे दखलपात्र अपराध होण्यापासून अटक करणे हे त्यांचे कर्तव्य असतांना ते न बजावण्यासाठी खाजगी इसम राजू पाटील याच्या माध्यतातून लाच मिळविण्याचा प्रयत्न केला तसेच खाजगी इसम राजू भिसे पाटील याच्याशी संगणमत करून जनावराचे वाहतुकीस स्वतःही अटकाव करणार नाही किंवा दुस-यालाही कारवाई करू देणार नाही अशा प्रकारचे षडयंत्र करून कट रचला. म्हणून माझी पोउपनि अयुब कुरैशी (शेख) व खाजगी इसम राजू भिसे पाटील यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7A प्रमाणे व सहकलम भारतीय न्याय संहिता कलम 61 (2), 62 कायदेशीर तक्रार आहे. माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली, ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

फिर्यादी
अब्दुल सोहेल पि. अब्दुल मुजीब, वय 26 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रा.जामा मस्जिद जवळ, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड
पो.स्टे गु.र.न. व कलम
पो.स्टे. इतवारा, जि.नांदेड गु.र.नं. /2025
भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7। व
सहकलम भारतीय न्याय संहिता कलम 61 (2), 62
आरोपीचे नांव व तपीषील
1) पोउपनि अयुब कुरैषी, नेम. डिवायएसपी आॅफीस, अर्धापूर, जि. नांदेड.
2) खाजगी इसम राजू भिसे पाटील
गुन्हा घडला तारीख वेळ, ठिकाण
दिनांक 24/05/2025 रोजी 15ः43 ते 16ः50 वाजताचे दरम्यान
ठिकाण- खान श्री हाॅटेल समोर, ईतवारा, नांदेड.
लाच मागणी रक्कम
50,000/-रूपये
लाच स्वीकृती रक्कम
-
दाखल करणार

तपास अधिकारी
श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.
खुलासा:- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीस त्यांचे लोडींग अॅटोमध्ये अर्धापूर येथून जनावरे वाहतुक करण्यासाठी पोउपनि अयुब कुरैषी यांनी पन्नास हजार रूपये लाचेची मागणी करून खाजगी इसम पाटील यांनी लोकसेवक यांना लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिले.
पोउपनि अयुब कुरैषी (षेख) हे पोलीस अधिकारी असून त्यांना दखलपात्र अपराधाबाबत माहिती होती. त्यांचे समक्ष व त्यांचे मुकसंमतीने खाजगी इसम नामे राजू भिसे पाटील हे जनावरे वाहतुकीचे नियोजन करीत होते तसेच अषा जनावरे वाहतुकीस जर कोणी अडथळा आणल्यास त्यास गाडीने ठोकर देवून उडवून देण्याची भाश्य देखील करीत होते.

पोउपनि अयुब कुरैषी (षेख) यांचे पोलीस अधिकारी म्हणून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 168 प्रमाणे दखलपात्र अपराध होण्यापासून अटक करणे हे त्यांचे कर्तव्य असतांना ते न बजावण्यासाठी खाजगी इसम राजू पाटील याच्या माध्यतातून लाच मिळविण्याचा प्रयत्न केला तसेच खाजगी इसम राजू भिसे पाटील याच्याषी संगणमत करून जनावराचे वाहतुकीस स्वतःही अटकाव करणार नाही किंवा दुस-यालाही कारवाई करू देणार नाही अषा प्रकारचे शडयंत्र करून कट रचला. म्हणून माझी पोउपनि अयुब कुरैषी (षेख) व खाजगी इसम राजू भिसे पाटील यांच्याविरूध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7। प्रमाणे व सहकलम भारतीय न्याय संहिता कलम 61 (2), 62 अन्वये सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

Ranjeet Vilasrao Bhoite(I (Inspector)) / PI

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** पो.स्टे. इतवारा, नांदेड
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ranjeet Vilasrao Bho

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI